महाराष्ट्र लोकसेवा आयोग
**Maharashtra Public Service Commission**

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्सः२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक : एमआयएस-०६१७/सीआर-५०/२०१७/तीन                                    दिनांक : ७ जून, २०१८

# घोषणा

**विषय:** महाराष्ट्र गट ‘क’ सेवा पूर्व परीक्षा २०१८ परीक्षेस
विहित वेळेपूर्वी उपस्थित राहणेबाबत - उमेदवारांस सूचना.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक १० जून, २०१८ रोजी महाराष्ट्र गट ‘क’ सेवा पूर्व परीक्षा २०१८ आयोजित करण्यात आली आहे. परीक्षेसाठी येतांना आवश्यक लेखनसाहित्य व ओळखीच्या पुराव्याबाबत, तसेच परीक्षेच्या दिवशी आयोजित मोर्चे, आंदोलने, वाहतुक व्यवस्था विस्कळित होणे, अतिवृष्टी, सार्वजनिक वाहतुकीचा खोळंबा, इत्यादी बाबी लक्षात घेऊन, परीक्षेच्या दिवसाच्या कालावधीचे पूर्व नियोजन उमेदवारांनी स्वत:हून करणे व कोणत्याही परिस्थितीत विहित वेळेपूर्वी पुरेसे अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रांवर उपस्थित राहणे आवश्यक असल्याच्या सूचना उमेदवारांस विविध माध्यमांद्वारे (सर्वसाधारण सूचना/ प्रवेशपत्रावरील सूचना/ घोषणा/एसएमएस) यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत.

**२.**दिनांक ८ जून, २०१८ ते ११ जून, २०१८ या कालावधीत मुंबईसह राज्यामध्ये विविध ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्यामार्फत वर्तविण्यात आली आहे. हे लक्षात घेता उमेदवारांनी अधिक काळजी घेऊन विहित वेळेपेक्षा पुरेसा अवधी अगोदर परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. जेणेकरुन ऐनवेळेस उदभवू शकणा-या अडचणी टाळता येणे शक्य होईल. विहित वेळेनंतर उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**३.**परीक्षेस येतांना उमेदवाराने ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड व स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही दोन **‘मूळ’** ओळखपत्रे, तसेच त्या दोन्ही ओळखपत्रांची प्रत्येकी एक छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. मूळ ओळखपत्राच्या पुराव्याऐवजी त्याच्या छायांकित प्रती अथवा कलर झेरॉक्स अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा ओळखीचा पुरावा सादर केल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व उमेदवारास परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण: मुंबई.

सुनिल अवताडे
उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.